Office of The Divisional Forest Officer,
Mumbai Mangrove Conservation Unit
68-B, Kamgar Nagar,
Near Tilaknagar Station,
Kurla (E) - 400 024
Phone / Fax .022-25220097

महाराष्ट्र वन विभाग

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचेकार्यालय
ब-6 8 कामगार नगर
टिळकनगर स्टेशन जवळ,
कुर्ला पूर्व- 400 024.
Email:-dfommcu@gmail.com

विषय-- D.P.S स्कूल पामबीच रोड नवी मुंबई
येथील कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत..
जा.क्र. कक्ष- ०५/ ल.ले/ 2769 /2018-19
कुर्ला-४०० ०२४ दि.- 15 /03 /2019.

प्रति,
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष
तथा
सदस्य सचिव
मुंबई व मुंबई उपनगरे कांदळवन सनियंत्रण समिती

**संदर्भ**.- वनपरिक्षेत्र अधिकारी नवी मुंबई यांचेकडील
पत्र क्र./न.मुं.का.संघ/अतिक्रमण/278/2018-19 दि. 18.02.2019.

**महोदय,**

Steno cupdate

उपरोक्त विषयान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीचे दि. 25.02.2019 रोजीच्या बैठकिमधील इतिवृत्तातील मुद्दा क्र. 57 अन्वये श्री. व्ही.के.गांधी यांचे तक्रारी अर्जा संबंधी DPS स्कूल पामबीच रोड नवी मुंबई येथे वनरक्षक नेरुळ व वनपाल वाशी यांनी स्थळावर समक्ष जाऊन पाहणी केली असता सदर ठिकाणी सिडको मार्फत प्रवासी जलवाहतूकीसाठी जेट्टी बांधण्याचे काम चालू असल्याचे दिसून आले. वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत सदर कामासंबंधी पुर्व परवानग्या घेऊनचे सिडको मार्फत प्रवासी जलवाहतूकीसाठी जेट्टी बांधणेचे काम चालू आहे. त्यामुळे अर्जात नमूद केलेले मोठ्या प्रमाणात कांदळवनाचा ऱ्हास होत असलेचे नमूद केले आहे ते पूर्णत: चूकीचे आहे. मंजूरी असलेल्या क्षेत्रातच वनखात्याच्या मंजूरीने वृक्ष तोडण्यात आली आहेत.

सहपत्र- वरीलप्रमाणे.

(व्ही. आर. जगताप)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक- 5594
दिनांक- 16/3/19
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**वनपरिक्षेत्र अधिकारी कांदळवन संधारण घटक, नवी मुंबई यांचे कार्यालय**
रो.हाऊस नं-26 भारत बिजली मार्ग. श्रीराम महाविद्यालय मागे, सेक्टर 04, ऐरोली नवी मुंबई 400 708
Email:rfomnm@gmali.com

**विषय:**-D.P.S स्कूल पामबीच रोड नवी मुंबई येथील कांदळवनाच्या -हासाबाबत...
जा.क्र./न.मुं.का.संघ/अतिक्रमण/ २७८/२०१८-१९
नवी मुंबई दि. १८/ ०२/२०१९

**प्रती,**
मा. विभागीय वन अधिकरी,
मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई

**संदर्भ:**-श्री. व्ही.के.गांधी यांचा दि.१३/०२/२०१९ रोजीचा इमेल वरील तक्रारी अर्ज.

**मा.महोदय,**

विषयांकित प्रकरणी उपरोक्त तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने DPS स्कूल पामबीच रोड नवी मुंबई येथे स्थळावर समक्ष जाऊन पाहणी केली असता सदर ठिकाणी सिडको मार्फत प्रवासी जलवाहतूकीसाठी जेट्टी बांधण्याचे काम चालू असल्याचे दिसून आले. स्थळावर सिडकोच्या संमधित अधिकारी यांना विचारणा केली असता सदर जेट्टीचे कामी सर्व विभागांच्या पुर्व परवानग्या घेऊनच कामे चालू असल्याचे संमधित अधिका-याने सांगितले. या कामी मंजूर परवानगी असलेल्या कांदळवन क्षेत्रात बाधित होणा-या वृक्षाची तोड ही या वनपरिक्षेत्रा मार्फत करण्यात आली असून त्या बाबीकडे अर्जदारांचा रोख दिसून येतो. वास्तविक प्रस्तृत प्रकरणी सदर कामासंबंधी पुर्व परवानग्या घेऊनचे सिडकोमार्फत प्रवासी जलवाहतूकीसाठी जेट्टी बांधणेचे काम चालू आहे. त्यामूळे अर्जात नमूद केलेले मोठया प्रमाणात कांदळवनाचा -हास होत असलेचे नमूद केले आहे ते पूर्णत: चूकीचे आहे. स्थळावरील वस्तूस्थिती ही वरील प्रमाणे मंजूरी असलेल्या क्षेत्रातच वनखात्याच्या मंजूरीने वृक्ष तोडण्यात आली आहेत. अर्जदार यांनी प्रस्तृत प्रकरणी कुठलीही शहानिशा न करता सदरचा अर्ज केला आहे तरी सदरचा अर्ज निकाली काढणेस विनंती आहे. सोबत वनरक्षक नेरूव व वनपाल वाशी यांचा अहवाल माहितीस्तव सादर केला आहे.

(पी.आर.चौधरी)
वनपरिक्षेत्र अधिकारी
कांदळवन संधारण घटक नवी मुंबई

**सहपत्र:**- वरीलप्रमाणे.

विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई
यांचे कार्यालय
आवक क्रमांक:- 3673 Steno
दिनांक 01/03/19
वनकर्मचारी
विभागीय वन अधिकारी,

रिपोर्ट

विषय :- डि. पी. एस. स्कूल पामबिच रोड नवी मुंबई येथील कांदळवन घास तक्रारी बाबत...

दिनांक :- १५/०२/२०१९.

प्रति,
मा. वनपरिक्षेत्र अधिकारी
कांदळवन संधारण घटक,
नवी मुंबई

~~महोदय~~, संदर्भ :- आपले पत्र क्र. जा.क्र - २६७ दि. १४/०२/२०१९

महोदय,

आपले उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये तसेच आपहुजुरांचे समक्ष आदेशाप्रमाणे कोकण, मॅग्रोव्ह वरील दि. १४/०२/२०१९ चे तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने डि. पी. एस. पामबीच रोड नवी मुंबई येथे स्थळावर जाऊन समक्ष चौकशी केली असता सिडको मार्फत सदर ठिकाणी प्रवासी जलवाहतुकीसाठी जेट्टी बांधण्याचे काम सिडको मार्फत चालू असल्याचे दिसून आले.

स्थळावर सिडको चे संबंधीत अधिकाऱ्यांशी विचारणा केली असता सिडको मार्फत सर्व विभागांच्या पूर्व परवानग्या घेऊनच प्रस्तुत कामे चालू असल्याचे संबंधीत अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे तक्रारी अर्जात नमूद असलेल्या बाबी स्थळावरील वस्तुस्थितीचा विपर्यास करणाऱ्या आहेत.

याच प्रकरणी बाबी संबंधी सिडको मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रवासी जलवाहतूक टर्मिनल च्या प्रकल्पास मंजुरी देण्यात आलेली असून त्याप्रकल्पात बाधित होणाऱ्या कांदळवन वृक्षांची तोड वन खात्याच्या मंजुरीने करण्यात आलेली आहे. त्यामुळे अर्जदारांचा रोख हा वरील मंजुरीप्राप्त क्षेत्रातील तोडलेल्या झाडांकडे असावा व त्यांनी पुर्ण चौकशी न केली असतानाच तक्रार केलेली आहे.

Bagul
(वनरक्षक)

सहमती सह सदर रिपोर्ट सादर

वनपाल वाशी

DFO प्रति
कार्यवाही
16/2/19